महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ ०९ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३१० ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

प्रतिनिधी हवे आहेत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी प्रतिनिधी नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१

# 'ऑपरेशन सिंदूर सुरूच!'

## सर्वपक्षीय बैठकीत राजनाथ सिंह यांची माहिती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : केंद्र सरकारच्या वतीने गुरुवारी बोलविण्यात आलेल्या सर्वपक्षीय बैठकीत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी "ऑपरेशन सिंदूर अद्याप संपलेले नाही", असे स्पष्टपणे सांगितले. भारताने केलेल्या एअर स्ट्राइकमध्ये किमान १०० दहशतवाद्यांचा खात्मा झाल्याची माहितीही त्यांनी या बैठकीत दिली. सर्वपक्षीय बैठकीनंतर केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनीही या माहितीला दुजोरा दिला.



### आम्हाला अजून लष्करी कारवाई करायची नाही, पण....

राजनाथ सिंह यांनी बैठकीत, या ऑपरेशनची अधिक तांत्रिक माहिती उघड करता येणार नाही, असे स्पष्ट केले. तथापि, पाकिस्तानने हल्ला केल्यास भारत जोरदार प्रत्युत्तर देईल, असा इशाराही त्यांनी दिला. भारत सरकारला आणखी कोणतीही लष्करी कारवाई करायची नाही, परंतु शत्रू सैन्याने हल्ला केल्यास जोरदार प्रत्युत्तर दिले जाईल असे त्यांनी सांगितले.

### राहुल गांधी आणि काँग्रेसचे समर्थन

बैठकीत बोलताना खरगे म्हणाले, "पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान व पीओकेमधील नऊ ठिकाणी जी कारवाई केली त्याबाबत सरकारने सर्व राजकीय पक्षांना माहिती दिली. काही माहिती गोपनीय असल्यामुळे उघड केली जाऊ शकत नाही, हे आम्ही समजतो. अशा कठीण प्रसंगी आम्ही सरकारवर दबाव आणत नाही आणि राष्ट्रहितासाठी सरकारसोबत आहोत." राहुल गांधी म्हणाले, "आम्ही सरकारला पूर्ण पाठिंबा दिला आहे. खरगेजींनी जे सांगितले तेच आमचेही म्हणणे आहे - काही मुद्द्यांवर सरकार चर्चा करू इच्छित नाही, ते आम्ही मान्य करतो."

### सर्व राजकीय पक्ष एकाच सुरात बोलले ; हे सरकारचं यश - किरण रिजिजू

सर्वपक्षीय बैठकीनंतर केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनीही संरक्षणमंत्र्यांनी दिलेल्या माहितीला दुजोरा दिला. तसेच, सर्वपक्षीय बैठक सौहार्दपूर्ण पद्धतीने पार पडली. सर्व राजकीय नेत्यांनी भारतीय सशस्त्र दलांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या कारवाईला पाठिंबा दिला, असे सांगितले. केंद्रीय मंत्री किरण रिजिजू म्हणाले, "सर्व राजकीय पक्ष एकाच सुरात बोलले, हे सरकारचं यश आहे. 'ऑपरेशन सिंदूर'नंतरच्या घडामोडी सतत सुरु असल्यामुळे अधिकाऱ्यांना बैठकीत बोलावण्यात आले नव्हते. मात्र पुढील कारवाईसंदर्भात राजकीय पक्षांशी चर्चा झाली आहे."

### बैठकीत सहभागी नेते

या बैठकीचं अध्यक्षस्थान संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी भूषवले. यामध्ये केंद्र सरकारच्या वतीने गृह मंत्री अमित शहा, भाजप अध्यक्ष जे.पी. नड्डा, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, अर्थमंत्री निर्मला सीतारामन सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे विरोधी पक्षांतून काँग्रेसचे मल्लिकार्जुन खरगे व राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे रामगोपाल यादव, एआयएमआयएमचे असदुद्दीन ओवैसी, तृणमूल काँग्रेसचे सुदीप्त बंधोपाध्याय,शिवसेनेचे श्रीकांत शिंदे,आपचे संजय सिंह,माकपचे जॉन ब्रिटास,लोकजनशक्ती पक्षाचे चिराग पासवान, द्रमुकचे टी.आर. बालू व तिरूचि शिवा, बिजू जनता दलाचे सस्मित पात्रा हे नेतेही सहभागी झाले होते.

## थोडक्यात महत्वाचे



## लोकसेवा हक्क पंधरवडानिमित्त सेवा प्रमाणपत्रांचे वितरण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मिरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिनानिमित्त सेवा प्रमाणपत्र वितरण समारंभ नुकतेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) येथे उत्साहात पार पडला. या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, उपायुक्त प्रसाद शिंगटे तसेच इतर मान्यवर अधिकारी, कर्मचारी आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका सध्या ६५ शासकीय सेवा नागरिकांना वेळेत, पारदर्शक व उत्तरदायित्वाने देत आहे. या अधिनियमाच्या दशकपूर्ती वर्षानिमित्त, महानगरपालिकेने नागरिकांना सेवा प्रमाणपत्र आणि उत्कृष्ट सेवा देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना सन्मानित करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

या कार्यक्रमात विविध विभागातील सेवा प्रमाणपत्रांचे वितरण आयुक्त तथा प्रशासक राधाविनोद शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. त्यामध्ये जन्म नोंदणी प्रमाणपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, कर विभाग प्रमाणपत्र, अग्निशमन विभाग प्रमाणपत्र, नगररचना विभाग यांचा समावेश आहे. तर मिरा भाईंदर महानगरपालिकेत अधिकारी कर्मचारी यांनाही प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. अशा प्रकारे एकूण मिळून 122 प्रमाणपत्राचे वाटप महाराष्ट्र लोकसेवा हक्क पंधरवडा निमित्त करण्यात आले.

## आपत्ती व्यवस्थापन आणि बचावाचे धडे प्रत्येकासाठी आवश्यक
### -कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे,दि.08 : जम्मू आणि काश्मीर येथील पहलगाम इथे दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान सीमेवर सध्या तणावाचे वातावरण आहे. पार्श्वभूमीवर कौशल्य विभाग आणि अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्यात येत आहेत. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते ठाणे येथील राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आज या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षणाधिकारी अनिल सदाफुले, ठाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य स्मिता माने, शासकीय तांत्रिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.टिकोले, राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सर्व कर्मचारी व विद्यार्थीनी उपस्थित होते. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा पुढे म्हणाले की, राज्यातल्या सर्व औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात ऑनलाईन द्वारे आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यशाळा होणार आहेत.

आपत्ती व्यवस्थापन ही काळाची गरज आहे. आपत्ती मानव निर्मित असो किंवा नैसर्गिक असो, याचे व्यवस्थापन आणि बचाव कसा करावा, याचे प्रशिक्षण प्रत्येक नागरिकाने घेतले पाहिजे. मानवाने प्रगती केली असली तरी, आपत्तीचे स्वरूप ही त्यानुसार बदलले असून बचावाचे प्रशिक्षण नव्या पिढीला देण्याचा आमचा उद्देश असल्याचे श्री. लोढा म्हणाले.

## सेफ वॉटर नेटवर्कच्या इंडियाकडून गोवेली गावाला शुद्ध पाणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा, ता. ८ (वार्ताहर) : पाण्यासाठी अनेक ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना वणवण करावी लागते. अशा परिस्थितीत शुद्ध पाणी मिळणे म्हणजे येथील ग्रामीण भागासाठी केवळ अशक्य बाब आहे; मात्र कल्याण तालुक्यातील गोवेली गावात समाजसेवक कैलाश धुमाळ तसेच राम चोरगे यांच्या सहकार्यातून तसेच सेफ वॉटर नेटवर्कच्या इंडिया या संस्थेच्या माध्यमातून तब्बल २५ वर्षानंतर शुद्ध पाणी मिळाले आहे.

गोवेली गावात गेली अनेक वर्षे पाण्याची समस्या भेडसावत होती. त्यातूनच स्वच्छ पाणी मिळणे हे दुरापास्तच होते. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी गावातील समाजसेवक धुमाळ तसेच त्यांचे चोरगे व अन्य मंडळी यांनी पुढाकार घेत स्वच्छ, सुरक्षित व परवडणाऱ्या दरात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी कार्यरत असलेल्या सेफ वॉटर नेटवर्क इंडिया संस्थेच्या उपक्रमाबद्दल माहिती मिळवत आपल्या गोवेली गावासाठी संस्थेचा आयजल स्टेशन हा उपक्रम सुरू केला आहे. या माध्यमातून ग्रामस्थांना एका प्रीपेड कार्डच्या माध्यमातून २० लिटर पाण्याचा जार हा केवळ सात रुपयांत मिळणार असल्याची माहिती संस्थेचे शंकर बत्रा यांनी गोवेली गावातील आयजल स्टेशन कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी दिली.

कार्यक्रमाला समाजसेवक कैलाश धुमाळ, राम चोरगे, गोवेली गावच्या सरपंच पूजा जाधव, माजी उपमहापौर बुधाराम सरनोबत, माजी सभापती योगेश धुमाळ तसेच इवचाल मणियार यांसह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. सेफ वॉटर नेटवर्क या संस्थेने आतापर्यंत ३४३ जलकेंद्रे स्थापन करून सुमारे १३ लाख नागरिकांना थेट लाभ दिला आहे. या जल केंद्रांमुळे महिलांचा वेळ वाचतो आहे, आरोग्य सुधारते आहे आणि सामाजिक विकासाला चालना मिळत आहे.

## भिवंडी गुन्हे शाखेची धडक कारवाई
### ४५ लाखाच्या बनावट नोटांसह ६ जण गजाआड



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहरातील शांतीनगर परिसरात असलेल्या अवचित पाडा या भागात बनावट नोटा आपल्या कब्जात बाळगून त्यांची खऱ्या नोटांशी अदलाबदल करण्यासाठी आलेल्या टोळीला भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांच्या पथकाने चार दिवसापूर्वी सुमारे 30 लाख रुपयांची रोकड, मोबाईल फोनसह ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी दिलेल्या माहितीवरून या गुन्हयात आणखी तिघांना ताब्यात घेऊन अटक केली आहे,त्यांच्या कडून सुमारे 15 लाख रुपये व बनावट नोटा छापण्यासाठी वापर केलेला लॅपटॉप, प्रिंटर,बनावट नोटांचे खऱ्या नोटांच्या मापात कटींग करण्यासाठी वापरलेले कटर, नोटा छापण्यासाठी लागणारे बॉन्ड पेपर असे ऐकुन आता 45 लाख रूपये व मुद्देमाल जप्त केला आहे. सुरज तानाजी शेंडे,भरत वाळकु सासे,स्वप्नील जगदीश पाटील, रामदास शालिक दळवी,विजय सुदाम कर्णेकर उर्फ विकी, शेखर रामदास बत्तीन असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नांवे आहेत.

याबाबत पोलिस सुत्रांनी माहिती दिली कि भिवंडी शहर परिसरात काही इसमांची टोळी बनावट नोटा तयार करून त्या खऱ्या नोटांशी अदलाबदल करून गैरकृत्य करीत आहेत त्यामुळे मिळालेल्या माहिती वरून ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे,सह पोलीस आयुक्त डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण,गुन्हे शाखेचे पोलीस उपाआयुक्त अमरसिंह जाधव,एसीपी शेखर बागडे यांच्या मार्गदर्शना खाली भिवंडी पोलीस पथकाने चार दिवसापूर्वी भिवंडीतील अवचितपाडा या ठिकाणी सापळा रचून तिघांना 500 रूपये दराच्या भारतीय चलनातील बनावट नोटांची 60 बंडल प्रत्येक बंडल मध्ये 100 नोटा अशा ऐकुन 30 लाख रुपये जप्त करून सखोल चौकशी सुरू केली असता या गुन्हयात आणखी तीन साथीदार असल्याचे सांगण्यात आले त्यामुळे पोलिसांनी रामदास,विजय व शेखर यांना ताब्यात घेऊन अटक करून चौकशीत त्यांनी दिलेल्या माहिती वरून भिवंडीतील सावद नाका येथून बनावट नोटा छापण्यासाठी वापर केलेला लॅपटॉप,प्रिंटर,बनावट नोटांचे खऱ्या नोटांच्या मापात कटींग करण्यासाठी वापरलेले कटर, नोटा छापण्यासाठी लागणारे बॉन्ड पेपर व 15 लाख 50 हजार रुपयांच्या बनावट नोटा इ.साहित्य जप्त केले असुन आता पर्यंत एकुण 45 लाख 50 हजार रुपयांच्या बनावट नोटा जप्त केल्या ची माहिती गुन्हे शाखेचे पोलीस उपाआयुक्त अमरसिंह जाधव यांनी दिली.

## भिवंडी मनपा वर्चस्वासाठी राजकीय पक्षांची मोर्चेबांधणी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी, ता. ८ (वार्ताहर) मुस्लिमबहुल लोकसंख्या असलेल्या भिवंडी शहरात महापालिका निवडणुकीत काँग्रेसचे वर्चस्व होते, मात्र अंतर्गत बंडांमुळे शहरात काँग्रेसची वाताहात झाली आहे. विधानसभा निवडणुकीत समाजवादी पक्षासह भाजपने मतदारसंघ कायम राखल्याने समाजवादीसह भाजपमध्ये रस्सीखेच असणार आहे, तर वाताहत झालेल्या काँग्रेससह राष्ट्रवादी शरद पवार गटालादेखील अस्तित्व टिकवण्याचे आव्हान आहे. भिवंडी पूर्व विधानसभा मतदारसंघात समाजवादी पक्षाचे रईस शेख दुसऱ्यांदा निवडून आले आहेत. तर पश्चिम मतदारसंघातून भाजपचे महेश चौघुले तिसऱ्यांदा विजयी झाले आहेत. यापूर्वी दोन नगरसेवक असलेल्या समाजवादीची ताकद वाढली आहे, मात्र पूर्व व पश्चिममधील अंतर्गत वाद निवडणुकीत नेमकी कोणती भूमिका घेणार यावर पक्षाचे भवितव्य ठरणार आहे. लोकसभा, विधानसभा मनपा निवडणुकीत झालेल्या पराभवामुळे एकहाती सत्ता असलेल्या काँग्रेसची सध्या शहरात पूर्ण वाताहात झाली आहे, तर काँग्रेसचे महापौर जावेद दळवी यांनी काँग्रेसच्या वाताहत झाल्यानंतर शहरात पुन्हा एकदा आपल्या जुन्या भिवंडी विकास आघाडीचे पुनर्जीवन केले आहे. त्याचा फटका काँग्रेस पक्षाला बसू शकतो. शहरात शिवसेनेचे सर्व नगरसेवक शिंदे सेनेत आल्याने भादवड, टेमघर व कामतघर येथे प्रभाव कायम राहणार आहे, तर तटस्थ भूमिकेत असणारे कोणार्क विकास आघाडीचे विलास पाटील या वेळी पश्चिम मतदारसंघात अपक्ष निवडणूक लढल्याने भाजपसह, काँग्रेस, समाजवादी पक्षामुळे राजकीय समीकरण बदलणार आहे.

### पालिकेतील पक्षीय बलाबल

भिवंडी महापालिकेत ९० नगरसेवक संख्या आहे. २०१७ च्या महापालिका निवडणुकीत काँग्रेसचे ४७ नगरसेवक निवडून आले होते. भाजपचे १९, शिवसेनेचे १२, कोणार्क विकास आघाडीचे चार, आरपीआय एकतावादीचे चार, समाजवादीचे दोन, अपक्ष दोन असे पक्षीय बलाबल होते.

## खर्डी बाजारपेठेवर सीसीटीव्हीची नजर
### खर्डी व्यापारी असोसिएशनचा निर्णय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापुर : शहापुर तालुक्यातील खेड्यापाड्यात दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असून नागरिकीकरण होत आहे.त्यामुळे चोऱ्या,घरफोड्या,महिलांची दागिने खेचणे व इतर अनैतिक प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याने यावर तात्काळ उपाययोजना व्हावी व संबंधित गुन्ह्याचा तपास तात्काळ लागावा यासाठी खर्डी व्यापारी असोसिएशनच्या वतीने खर्डी बाजारपेठेत महत्वाच्या ठिकठिकाणी अक्षय तृतीयाचे औचित्य साधून सीसीटीव्ही लावण्यात आले आहेत.या सीसीटीव्हीच्या कंट्रोल रूमचे उदघाटन पोलीस उपनिरीक्षक सुरेश बाविस्कर यांच्या हस्ते खर्डी बाजारपेठेतील संतकृपा ज्वेलर्स येथे करण्यात आले.

खर्डी-वाडा रोडवरील वनविभागाचे कार्यालय ते बाजारपेठ मधील मस्जिदचा परिसर,वैतरणा रोड तलावापर्यंत, बाजारपेठ चौक व पातकर यांच्या दुकानासमोरील चौक या ठिकाणी 13 सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून लवकरच आणखी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असल्याचे खर्डी व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अनिल पातकर यांनी यावी जाहीर केले.खर्डीतील नाका परिसर व खर्डी स्टेशन बाजारपेठेत ही सीसीटीव्ही लावण्यात यावेत असे अवाहन यावेळी पोलीस उपनिरीक्षक सुरेश बाविस्कर यांनी केले. यावेळी व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अनिल पातकर, देवालय ट्रस्ट चे अध्यक्ष गणेश अधिकारी,शाकिर शेख,अरुण पातकर,संजय पोद्दार,गणेश पातकर,प्रसाद महाले,नरेश जाधव,गणपत सापळे,दिलीप वाघ,अजय बागुल व ओंकार सारंगधर,पोलीस अंमलदार जितेन गिरासे,भाऊसाहेब मुंडे, यांच्यासह व्यापारी वर्ग उपस्थित होते.

## अवकाळी पावसाने महावितरणचे पितळ उघडे
### निकृष्ट कामामुळे पहिल्याच पावसात वीजवाहिन्या उध्वस्त



### अधिकारी - ठेकेदारांच्या संगनमताने भ्रष्ट कारभार
#### लाखो वीजग्राहकांना नाहक त्रास

कल्याण,अंबरनाथ,शहापूर,भिवंडी,मुरबाड, बदलापुरतील विजेचे खांब , रोहित्रासह पाच किलोमीटरच्या वीजवाहिन्या उध्वस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण: गेल्या तीन दिवसांमध्ये वादळी वाऱ्यांसह झालेल्या अवकाळी पावसाचा मोठा फटका कल्याण परिमंडलातील वीज वितरण यंत्रणेला बसला आहे. वादळामुळे ७० विजेचे खांब, ५ रोहित्र व पाच किलोमीटरच्या वीजवाहिन्या जमीनदोस्त झाल्या आहेत. विपरित परिस्थितीतही युद्धस्तरावर दुरुस्तीचे काम करून महावितरण कर्मचाऱ्यांनी वीजपुरवठा सुरळीत केला. यामध्ये महावितरणचे लाखो रूपयांचे नुकसान झाले. कल्याण मंडल एक कार्यालयांतर्गत डोंबिवली, कल्याण पूर्व आणि पश्चिम भागात एक खांब कोसळला असून चार ठिकाणी वृक्षांच्या फांद्या पडल्याने वीज वाहिन्यांचे नुकसान झाले. कल्याण मंडल दोन कार्यालयांतर्गत उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, मुरबाड, शहापूर, टिटवाळा तसेच ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात उच्चदाबाचे ४ खांब व लघुदाब वाहिनीचे ६५ खांब कोसळले व ४ किलोमीटरच्या वीजतारा, तसेच १ रोहित्र कोसळण्यासोबतच ४ रोहित्र नादुरुस्त झाले होते. मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली अधीक्षक अभियंते, सर्व कार्यकारी अभियंते, अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदाराचे कामगार घटनेच्या ठिकाणी राहून अथक काम करीत होते. त्यामुळे प्रतिकूल परिस्थितीतही कमी कालावधीत वीजपुरवठा सुरळीत करणे शक्य झाले, असे महावितरणच्या अधिकाऱ्याने सांगितले.






# गीतासार



## अध्याय १०
## विभूतियोगः

पवनः पवतामस्मि रामः शस्त्रभृतामहम् । झषाणां मकरश्चास्मि स्रोतसामस्मि जाह्नवी ॥ १०-३१ ॥

मी पवित्र करणाऱ्यांत वायू आणि शस्त्रधाऱ्यांत श्रीराम आहे. तसेच माशांत मगर आहे आणि नद्यांत भागीरथी गंगा आहे. ॥ १०-३१ ॥

सर्गाणामादिरन्तश्च मध्यं चैवाहमर्जुन । अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम् ॥ १०-३२ ॥

हे अर्जुना, सृष्टीचा आदी आणि अंत तसेच मध्यही मी आहे. मी विद्यांतील अध्यात्मविद्या म्हणजे ब्रह्मविद्या आणि परस्पर वाद करणाऱ्यांमध्ये तत्त्वनिर्णयासाठी केला जाणारा वाद आहे. ॥ १०-३२ ॥

अक्षराणामकारोऽस्मि द्वन्द्वः सामासिकस्य च । अहमेवाक्षयः कालो धाताहं विश्वतोमुखः ॥ १०-३३ ॥

मी अक्षरांतील अकार आणि समासांपैकी द्वंद्व समास आहे. अक्षय काल तसेच सर्व बाजूंनी तोंडे असलेला विराटस्वरूप, सर्वांचे धारण-पोषण करणाराही मीच आहे. ॥ १०-३३ ॥

मृत्युः सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम् । कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा ॥ १०-३४ ॥

सर्वांचा नाश करणारा मृत्यू आणि उत्पन्न होणाऱ्यांच्या उत्पत्तीचे कारण मी आहे. तसेच स्त्रियांमध्ये कीर्ती, लक्ष्मी, वाणी, स्मृती, मेधा, धृती आणि क्षमा मी आहे. ॥ १०-३४ ॥

बृहत्साम तथा साम्नां गायत्री छन्दसामहम् । मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः ॥ १०-३५ ॥

तसेच गायन करण्याजोग्या वेदांमध्ये मी बृहत्साम आणि छंदांमध्ये गायत्री छंद आहे. त्याचप्रमाणे महिन्यांतील मार्गशीर्ष महिना आणि ऋतूंतील वसंत ऋतू मी आहे. ॥ १०-३५ ॥

## रेसिपी
### चिकू एक सुपरफूड



**पचनसंस्था नियंत्रित करते**
चिकूमध्ये भरपूर फायबर असते. म्हणूनच, जर तुम्हाला बद्धकोष्ठता, गॅस किंवा अपचन सारख्या समस्या असतील तर ते खाल्ल्याने तुम्हाला खूप आराम मिळतो. दररोज ते खाल्ल्याने पोट स्वच्छ राहते आणि आपले अन्न व्यवस्थित पचते. पोटाची जळजळ शांत करते.

**हृदय निरोगी ठेवते**
चिकूमध्ये असलेले पोटॅशियम आणि अँटीऑक्सिडंट्स रक्तदाब नियंत्रित करतात आणि हृदय निरोगी ठेवतात. हे कोलेस्टेरॉलची पातळी संतुलित करण्यास देखील मदत करते

**हाडे बळकट करते**
चिकूमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस आणि लोह भरपूर प्रमाणात असते. या सर्व गोष्टी एकत्रितपणे आपली हाडे खूप मजबूत करतात. जर तुम्ही ते दररोज खाल्ले तर हाडांच्या आजारांचा धोका कमी होतो. विशेषतः वृद्ध आणि मुलांसाठी, हाडांना बळकटी देण्याचा हा एक चांगला मार्ग आहे.

**दृष्टीसाठी फायदेशीर**
चिकूमध्ये असलेले व्हिटॅमिन ए दृष्टी टिकवून ठेवण्यास मदत करते. हे मॅक्युलर डीजनरेशन आणि मोतीबिंदू सारख्या समस्यांपासून देखील संरक्षण प्रदान करते.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढवते**
व्हिटॅमिन ए, सी आणि ई च्या मुबलक प्रमाणात असल्याने, सपोटा शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते

# वासिंदमध्ये रंगणार चॉकबॉल स्पर्धा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


वासिंद : महाराष्ट्र राज्य चॉकबॉल संघटनेच्या मान्यतेने वासिंद शहरात प्रथमच 15 वी राज्यस्तरीय चॉकबॉल पुरुष व महिला अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी होणार असून ही स्पर्धा दिनांक 23 ते 25 मे 2025 रोजी श्रीसंत गाडगे महाराज आश्रम शाळा भातसई येथे होणार आहे. ठाणे जिल्हा चॉकबॉल असोसिएशन, न्यू आयडियल स्कुल अँड ज्यु कॉलेज, वासिंद व दिलीप जाधव फाउंडेशन यांच्या संयुक्त विध्यमाने आयोजित या स्पर्धेचे आयोजक ठाणे जिल्हा व भातसई ग्रामपंचायतचे उपसरपंच दिलीप जाधव हे परिश्रम घेत आहेत.



स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात व कुठेही गालबोट लागणार नाही याची दक्षता ठाणे जिल्हा चॉकबॉल असोसिएशनचे अध्यक्ष राहुल अकुल तसेच नवनिर्वाचित सचिव संदीप नरवाडे घेत आहे. महाराष्ट्र राज्य चॉकबॉल संघटनेच्या मान्यतेने होत असलेल्या या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून पुरुष व महिला गटाचे 25 जिल्ह्यानी आपला सहभाग नोंदवला असून अजून ही जिल्हे आपला सहभाग नोंदवतील अशी माहिती महाराष्ट्र राज्य चॉकबॉल संघटनेचेचे सचिव सुरेश गांधी यांनी दिली आहे. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा भरणा असल्यामुळे ही स्पर्धा अधिकच रंगतदार होणार आहे.

ठाणे जिल्हा संघाचा या गटात दबदबा असून सलग तीन वर्ष या स्पर्धेत प्रथम क्रमांकावर असल्यामुळे या वर्षी सुद्धा आपला दबदबा कायम ठेवण्याचे आव्हान संघासमोर असेल. तीन दिवस असणारी स्पर्धा साखळी पद्धतीने चालणार असून त्यानंतर बाद पद्धतीने व अंतिम सामना अशी होणार असून सर्व सामने फ्लड लाईट मध्ये खेळवण्यात येणार असल्याची माहिती जिल्ह्याचे सचिव संदीप नरवाडे यांनी दिली आहे.

# आधुनिक काळातील भगीरथ
## कर्मवीर भाऊराव पाटील



बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज पुण्यतिथी. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्यामनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्वना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सदगुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, (२७ मुलींसाठी ) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, ( १ मुलींसाठी ) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी ) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची पुण्यतिथी. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# झाड कोसळून मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत द्या
## रिक्षा चालक मालक असोसिएशनची केडीएमसी प्रशानाकडे मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेत झाड कोसळुन मृत पावलेल्या रिक्षा चालक व प्रवाशांच्या तसेच रुक्मिणी बाई रुग्णालयात वेळेत रुग्णवाहिका न मिळाल्याने मृत्यू झालेल्या महिलेच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई आर्थीक मदत द्या अशी मागणी रिक्षा चालक मालक असोसिएशनने कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रशानाकडे केली आहे. याबाबत केडीएमसीचे अतिरीक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांची अध्यक्ष प्रणव पेणकर व प्रमुख संघटक माजी नगरसेवक महेश गायकवाड यांनी मुख्य पदाधिकारी कार्यकर्ते रिक्षाचालक यांच्या समवेत शिष्टमंडळाने भेट घेऊन निवेदन दिले. आठ दिवसात त्या मृत चार जणांच्या कुटुबियांना मदत करा अन्यथा उग्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.



कल्याण पुर्व चिंचपाडा परीसरात वादळवार्याने एक झाड प्रवाशी वाहतुक करत असलेल्या रिक्षावर कोसळुन तीन जण ठार झाले. त्यात दोन प्रवाशी व एक रिक्षा चालकाचा समावेश आहे. उमाशंकर वर्मा वय ५३ असे मयत रिक्षाचालकाचे नाव आहे. रस्त्याच्या लगत असलेली जुनाट व वाढलेली झाडे छाटणी महापालिका प्रशासन करत असलेला हलगर्जी पणा व दुर्लक्ष यामुळेच तीन जणांना जीव गमवावा लागला असा आरोप रिक्षाचालकांनी केला आहे. रिक्षा चालक मालक असोसिएशन अध्यक्ष प्रणव पेणकर, प्रमुख संघटक माजी नगरसेवक महेश गायकवाड यांनी रिक्षा संघटनेच्या इतर पदाधिकारी यांच्या समवेत अतिरीक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांची भेट घेतली व निवेदन दिले.

निवेदनात मृत पावलेल्या रिक्षाचालक व दोन प्रवाशी यांना नुकसान भरपाई देऊन महापालिकेमार्फत आर्थिक मदत करण्याची मागणी केली. पुनशः अशा घटना घडु नये रस्त्यालगत व इतर जुनाट व प्रंचड वाढलेल्या झांडाची तत्परतेने छाटणी करावी अपघातग्रस्त खड्डेमय रस्त्यांची त्वरीत दुरुस्ती करावी अशीही मागणी व विनंती केली. अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी शासनाला महापालिकेतर्फे अहवाल पाठवुन मूख्यमंत्री सहाय्यतानिधीतुन अपघातग्रस्त मृत रिक्षाचालक व प्रवाशी यांना आर्थीक मदत दिली जाईल असे स्पष्ट केले. अपघातग्रस्त मृत रिक्षाचालक व मृत प्रवाशांना आर्थीक मदत मिळवुन देण्यासाठी रिक्षा संघटनेच्या वतीने शासनाकडे ही पत्रव्यवहार व पाठपुरावा करु असे प्रणव पेणकर म्हणाले.

रुक्मीणीबाई रुग्णालयात मध्ये नुकतेच उपचाराअभावी व वेळेत रुग्णवाहीका उपल्बध न झाल्याने मृत पावलेल्या महिलेच्या लहान मुलांची व झाड कोसळुन मृत पावलेल्या रिक्षाचालक व प्रवाशांच्या कुंदुबियांची परस्थिती हलाखीची आहे. घरातील कर्ते कमवते माणसं गमावल्याने त्यांना पुढील जिवन जगण कठीण आहे .आठ दिवसात आर्थिक मदत करा अन्यथा उग्र आंदोलन छेडु असा इशारा रिक्षा संघटनेचे प्रमुख संघटक माजी नगरसेवक महेश गायकवाड यांनी दिला आहे.यावेळी रिक्षा संघटनेच्या शिष्टमंडळात जॉन कॅलिमिनो, संतोष नवले, जितेंद्र पवार, साबु चेरीअन, प्रशांत बोटे, नुर जमादार, शगीर शेख, आबा भसमारे, सुनिल मोरे, बंडु वाडेकर, अनिल जगताप, प्रताप सरोदे, रिझवान शेख, सुभाष चौव्हाण, हिरु लोखंडे, चंद्रशेखर नवले, प्रविण वासनिक,गोरख झाडे आदी पदाधिकारी व शेकडो रिक्षा चालक उपस्थितीत होते.

# मुरबाड तालुक्यात अवकाळी वादळी पाऊस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड ग्रामीण भागात मंगळवारी रात्री पावणे दहा वाजण्याच्या सुमारास जोरदार वादळी पाऊस वाऱ्याचा फटका बसल्याने यामध्ये तालुक्यातील करवेळे, वैखारे,कोलठण,शिवळे,वनोटे येथील २५ते३० घरावरील पत्र / कौले उडून नुकसान झाले आहे. तसेच मासळे येथील जिल्हा परिषद शाळेवर झाड पडून शाळेचे नुकसान झाले आहे.

या घटनेची माहिती मिळताच मुरबाड तहसीलदार अभिजीत देशमुख यांच्या नेतृत्वाखाली तलाठी, सर्कल मंडळ यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी





### जोरदार वादळामुळे अनेक घरांचे नुकसान

करून ज्या ज्या घरांचे अशंत नुकसान झाले आहे त्या त्या घरांचे तात्काळ पचनामे करण्यात आल्याची माहिती मुरबाड तहसील कार्यालयातून देण्यात आली आहे. सदरचा प्राथमिक अहवाल पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आला आहे.

यापूर्वी १३ एप्रिल २०२५रोजी अककाली पावसाचा मुरबाड ग्रामीण भागात वादली वाऱ्यास पावसाचा जोरदार फटका बसला होता

### मुरबाड महसूल खात्यामार्फत पंचनामे पूर्ण!

त्यामध्ये जवळपास ४५ घरावरील पत्रे/कौले उडून नुकसान झाले होते त्यानंतर मंगळवार ६मे २०२५ रोजी रात्री पावणेदहा वाजण्याच्या सुमारास वादळीवाऱ्यासह जोरदार पाऊसचा फटका बसल्याने त्यामध्ये २५/ ३० घरांवरील पत्रे/कौले उडून नुकसान झाल्याचा हा तालुक्यात दुसऱ्यांदा फटका बसला आहे.तसेच गुरुवारी सकाळपासूनच ढगाळ वातावरण तसेच हवेतील गारवा जाणवला.

# ‘ऑपरेशन सिंदूर’चे यश
## डोंबिवलीत भाजपाचा जल्लोष



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : भारतीय वायुसेनेने हवाई हल्ला करत पाक व्यस्त काश्मीर मधील अतिरेक्यांच्या 9 तळावर अतिरेक्यांना यमसधनी धाडले.भारत सरकारने बदला घेतला असून ' 'ये ते सिर्फ ट्रेलर हे पिक्चर अभि बाकी हें'.. असं म्हणत भारतीय जनता पार्टीने डोंबिवली पूर्वेकडील इंदिरा चौक येथे नागरिकांना पेढे वाटत जल्लोष केला.

भाजपा कल्याण लोकसभा निवडणूक प्रमुख शशिकांत कांबळे, डोंबिवली पूर्व मंडल अध्यक्ष मितेश पेणकर, माजी नगरसेवक मुकुंद ( विशू ) पेढणेकर, माजी नगरसेविका खुशबु चौधरी,प्रकाश ( बाळा ) पवार, राजू शेख, रविसिंग ठाकुर, वर्षा परमार यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पहलगाम हल्ल्याच्या प्रत्युत्तरात भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदुर' राबवून पाकिस्तान मध्ये घुसून ९ दहशतवादी तळ उध्वस्त केले. “ऑपरेशन सिंदुर” च्या यशानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानत भाजपने जल्लोष केला. सरकारला बळ देण्यासाठी डोंबिवलीतील नागरिक व भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नागरिकांना पेढे वाटत, फटाके फोडत, व भाजपाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी पुढे येत एकमेकांना सिंदूर लावले. दहशतवाद व आतंकवादला धडा शिकवल्याबद्दल नरेंद्र मोदींचे यांचे व भारतीय सरकारचे आभार मानतो असे भाजपा कल्याण लोकसभा निवडणूक प्रमुख शशिकांत कांबळे म्हणाले.

# सार्वजनिक विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांचे १२ वी परीक्षेत घवघवीत यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एच.एस.सी.परीक्षा मध्ये सार्वजनिक विद्यामंदिर आणि ज्युनिअर कॉलेज पेण च्या आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून कॉलेजच्या यशाच्या शिरपेचामध्ये मानाचा तुरा खोवला आहे. त्याबद्दल विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



(अनमोल भोसले ९६.५० टक्के मिळवून प्रथम)

महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अॅड. पी.डी. पाटील , उपाध्यक्षा सौ दीपिका पाटील सचिव - राजेश पाटील, संचालक- अप्पा धनावडे , प्राचार्य संतोष नाईक उपप्राचार्य आर.आर. पाटील , व पर्यवेक्षक मोरे एस.एस. यांनी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष अॅड पी.डी. पाटील साहेब यांनी विद्यार्थ्यांना पेढा भरून आनंद साजरा केला.

सायन्स विभागातून कुमार अनमोल रवी भोसले या विद्यार्थ्याने ९६.५० टक्के गुण मिळवून विज्ञान विभागात प्रथम क्रमांक पटकावला, त्याचबरोबर कुमारी मृण्मयी राजेश ठाकूर व कुमारी मनस्वी प्रल्हाद जगताप या विद्यार्थिनींनी वाणिज्य शाखेमध्ये ७९.३३ गुण मिळवून वाणिज्य विभागातून प्रथम क्रमांक मिळवला, तर कला विभागा मध्ये कु. दुर्वा अविनाश म्हात्रे या विद्यार्थिनींनी ८६.५० गुण मिळवून कला विभागातून प्रथम क्रमांक मिळवला.

विज्ञान विभागात ३३२ मुलांपैकी ३३१ उत्तीर्ण झाले कॉमर्स मधून १५७ मुलांपैकी १५३ उत्तीर्ण तर कला शाखेत १५१ मुलांपैकी १३० उत्तीर्ण झाले आहेत अशी माहिती प्राचार्य संतोष नाईक यांनी दिली.

# सार्वजनिक शौचालयात शॉटसर्किटने आग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : पूर्वेकडील स्टेशनबाहेरील सार्वजनिक शौचालयात अचानक आग लागण्याची घटना गुरुवारी 8 तारखेला सकाळी सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास घडली. शौचालयातील विजेच्या मीटरला शॉटसर्किटने आग लागण्याने अचानक आग लागण्याने येथील कामगार व नागरिका घाबरून बाहेर पळाले. कर्मचाऱ्याने मीटर बॉक्सजवळील वायर कापल्याने आग पुढे वाढली नाही. आग पाहून ती विझविण्याकरता नागरिकांनी प्रयत्न केले. काही वेळ आग विझल्यावर कर्मचाऱ्याने सुटकेचा श्वास घेतला.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

# निधी नाही - ठाण्यातील वृक्ष तपासणी कागदावरच !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** वृक्ष पडून होणारी जिवितहानी तसेच वित्तहानी टाळता यावी यासाठी जर्मनीतील आधुनिक एमआरआय आधारीत यंत्राद्वारे वृक्षांची तपासणी (ट्री ऑडिट) करण्याचा निर्णय ठाणे महापालिका प्रशासनाने घेतला होता. यासंबंधीचा प्रस्तावही प्रशासनाने तयार केला होता. मात्र, निधी उपलब्ध नसल्यामुळे हा प्रस्ताव कागदावरच राहीला. यामुळे शहरातील वृक्ष तपासणी रखडली असल्याची बाब उघडकीस आली आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात पावसाळ्यात वृक्ष उन्मळून पडल्याचे प्रकार घडतात. अशा घटनांमध्ये काही नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. असे प्रकार टाळण्यासाठी ठाणे महापालिका क्षेत्रातील प्रमुख रस्ते, पदपथ, सार्वजनिक ठिकाणे, शाळा, रुग्णालये, उद्याने, चौक, बस स्टॉप आणि रहिवासी परिसरातील धोकादायक फांद्याची छाटणी करण्यात येत आहे. असे असले तरी बुधवारी अवकाळी पावसादरम्यान आणखी एक अपघात घडला. ठाण्यातील राबोडी भागात गुलमोहरचे झाड रिक्षावर कोसळले. यात तौफिक सौदागर (२७) या प्रवाशाचा मृत्यु झाला तर, रिक्षा चालक शफीक शब्बीर (५०) हे जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेच्या निमित्ताने शहरातील धोकादायक वृक्षांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

वृक्ष पडून जिवीतहानी होऊ नये यासाठी वृक्षांची तपासणी करण्याची मागणी सातत्याने होत असतानाही त्याकडे पालिकेचे दुर्लक्ष होत असल्याची बाब उघडकीस आली आहे. वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य विक्रांत तावडे यांनी अशा प्रकारची मागणी पाच वर्षांपूर्वी केली होती आणि गेल्यावर्षी आयुक्तांची भेट घेऊन जर्मनीतील आधुनिक एमआरआय आधारीत यंत्राद्वारे वृक्षांची तपासणी (ट्री ऑडिट) करण्याबाबत माहिती दिली होती. मात्र, निधी उपलब्ध नसल्यामुळे हा प्रस्ताव कागदावरच राहील्याची बाब समोर आली आहे.

जर्मनीतील आधुनिक एमआरआय आधारीत यंत्राद्वारे वृक्षांचे वय, आरोग्य, पोकळपणा, कीड लागलेली अवस्था, वाळवीचा प्रादुर्भाव आणि धोका ओळखता येतो. यामुळे वृक्षाच्या सदृढतेचा अंदाज येतो आणि वृक्ष दुर्घटनाग्रस्त होण्यापुर्वी सशक्त करण्याबाबत किंवा काढण्याबाबत निर्णय घेण्यात येतो. यामुळे जिवित व वित्तहानी टाळता येते.

याबाबत आयुक्तांना माहिती दिल्यानंतर त्यांनी याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. यानंतर वृक्ष प्राधिकरण विभागाने यासंबंधीचा प्रस्ताव तयार करून लेखा व वित्त विभागाकडे पाठविला.

परंतु मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी निधी उपलब्ध नसल्याचे कारण देत अधिकार नसतानाही त्यास लाल कंदिल दाखविला. त्यामुळे वृक्ष तपासणी रखडली आहे. यामुळेच वृक्ष पडून प्रवाशाचा मृत्यु झाल्याप्रकरणी वित्त अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य विक्रांत तावडे यांनी केली.

वृक्षांची पाणी करण्याची मागणी करूनही ती का केली जात नाही, असा प्रश्न उपस्थित करत धोकादायक वृक्षांच्या तक्रारी करूनही त्याकडे लक्ष दिले जात नसल्याचा आरोप वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य नम्रता भोसले यांनी केला.

# उल्हासनगरमधील धोकादायक इमारतींची यादी जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगरः** उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींची यादी नुकतीच उल्हासनगर महापालिका प्रशासनाने जाहीर केली. यात एकूण २६३ इमारतींचा समावेश आहे. तसेच ५१ इमारतींचे संरचनात्मक लेखापरिक्षण झाले नसल्याची बाबही समोर आली आहे. यात दोन इमारती अतिधोकादायक असून एक प्रभाग दोन तर दुसरी प्रभाग चारमध्ये आहे. इमारती रिकामी न करता संरचनात्मक दुरूस्ती करण्यायोग्य इमारतींची संख्या २०८ इतकी आहे.

**२६३ इमारतीं धोकादायक**
**५१ इमारतींचे संरचनात्मक लेखापरिक्षण नाही**
**२ इमारती अतिधोकादायक**

## 51 इमारतींचे लेखा परिक्षण नाही

**उल्हासनगर शहरातील धोकादायक इमारतींची यादी पालिका प्रशासनाने जाहीर केली असतानाच त्यात संरचनात्मक लेखापरिक्षण नसलेल्या इमारतींची संख्या तब्बल ५१ इतकी आहे. प्रभाग क्रमांक एक आणि दोन मध्ये प्रत्येकी १० तर प्रभाग तीन मध्ये ११ आणि प्रभाग चारमध्ये २० इमारतींचा यात समावेश आहे.**

उल्हासनगर शहरात गेल्या काही वर्षात कमकुवत झालेल्या जुन्या इमारती, त्यांचे स्लॅब कोसळल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. इमारतींच्या स्लॅब कोसळण्याच्या घटनेत अनेकांना आपला जीवही गमवावा लागला आहे. शहरातील पुनर्विकासाचा प्रश्न अजुनही सुटू शकला नसल्याने अजूनही रहिवासी धोकादायक इमारतीत राहतात. पावसाळ्यात अशा स्लॅब कोसळल्याच्या अनेक घटना घडत असतात. उल्हासनगर महापालिका दरवर्षी अशा धोकादायक इमारतींची यादी जाहीर करत असते. यंदाही नुकतीच उल्हासनगर महापालिकेने धोकादायक इमारतीची यादी जाहीर केली आहे. यात एकूण २६३ धोकादायक इमारतींचा समावेश आहे. ता चार प्रभागातील आणि चार विविध प्रकारातील इमारतींचा समावेश आहे. शहरात एकूण दोन इमारती अति धोकादायक प्रकारातील आहेत. अतिधोकादायक, तात्काळ निष्काशीत करण्यायोग्य आणि राहण्यास अयोग्य अशा या इमारती आहेत. प्रभाग क्रमांक दोन आणि चारमध्ये या दोन इमारती आहेत. यातील प्रभाग चारमधील एका इमारतीत रहिवासी वास्तव्य करत आहेत.

त्याचसोबत इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरूस्तीची गरज असलेल्या इमारतींची संख्या ३७ इतकी आहे. यात प्रभाग क्रमांक एकमध्ये ७, प्रभाग क्रमांक दोनमध्ये १३, प्रभाग क्रमांक तीनमध्ये १० आणि प्रभाग क्रमांक चारमध्ये ७ इमारती आहेत. तर इमारत रिकामी न करता संरचनात्मक दुरूस्ती करण्याची गरज असलेल्या इमारतींची संख्या २०८ आहे. यात प्रभाग क्रमांक एकमध्ये ७६, प्रभाग क्रमांक दोनमध्ये ५४, प्रभाग क्रमांक तीनमध्ये ५० आणि प्रभाग चारमधअये २८ इमारतींचा समावेश आहे. प्रभाग क्रमांक एकमध्ये सर्वाधिक इमारतींचा समावेश आहे. तर किरकोळ दुरूस्तीची गरज असलेल्या कमी धोकादायक इमारतींची संख्या १६ इतकी आहे.

# आसनगाव स्थानकातील पादचारी पुलाचे काम सुरु




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** मध्य रेल्वेच्या कल्याण-कसारा रेल्वे मार्गावरील आसनगाव रेल्वे स्थानकात कसारा दिशेने पूर्व पश्चिम भाग जोडणारा पादचारी पूल उभारणीच्या कामाला रेल्वे प्रशासनाने सुरूवात केली आहे. या कामामुळे रेल्वे प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. मागील सात ते आठ वर्षापूर्वी आसनगाव रेल्वे स्थानकातील कसारा दिशेकडील जुना पादचारी पूल तोडण्यात आल्यानंतर पूर्व बाजूकडे जाणाऱ्या प्रवाशांना रेल्वे स्थानकात वळसा घेऊन पूर्व भागात जावे लागत होते.

कल्याण कसारा रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष शैलेश राऊत, कल्याण कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष राजेश घनगाव, माजी अध्यक्ष जितेंद्र विशे यांनी रेल्वे प्रवाशांच्या वाढत्या मागणीचा विचार करून आसनगाव रेल्वे स्थानकात कसारा दिशेने पादचारी पूल उभारण्यासाठी मध्य रेल्वे प्रशासनाकडे अनेक वेळा निवेदने दिले होती. वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांबरोबर बैठका घेतल्या होत्या.

आसनगाव रेल्वे स्थानकातील कसारा बाजूकडील जिन्यावरील रेल्वे तिकीट खिडकीजवळून हा पादचारी पूल उभारण्यात येणार आहे. या पुलामुळे पूर्व भागातील प्रवाशांना आता धावपळ करत रेल्वे वाहनतळाजवळील कोंडीने अडकलेल्या रेल्वे जिन्याच्या भागात जाण्याची गरज लागणार नाही. आसनगाव पूर्व भागातील रेल्वे स्थानकाजवळील विहिरीजवळ या जिन्याची उभारणी होईल. आसनगाव रेल्वे स्थानकात पूर्वीपासून कसारा दिशेने पूर्व पश्चिम भाग जोडणारा जिना होता. आठ वर्षापूर्वी हा जिना नवीन पादचारी पुलाच्या उभारणीसाठी तोडण्यात आला. नवीन पादचारी पूल उभारणी करताना रेल्वे स्थानकात जिन्याची उभारणी करण्यात आली.

जिन्यावर रेल्वे तिकीट खिडकी सुरू करण्यात आली. रेल्वे तिकीट खिडकी ते पश्चिम भागात उतरण्यासाठी जिन्याची मार्गिका तयार करण्यात आली. परंतु, रेल्वेने पूर्व भागात उतरण्यासाठी जिन्याला मार्गिका बांधली नाही. त्यामुळे आसनगाव रेल्वे स्थानकात कसारा दिशेने लोकलमधून उतरणाऱ्या तीन ते चार डब्यातील प्रवाशांना दक्षिण दिशेला पाठीमागे जाऊन तेथून जिन्याने किंवा सरकत्या जिन्याने पूर्व बाजूला उतरावे लागते. या रेल्वे स्थानकातील मधल्या भागाचे जिने ४० ते ५० पायऱ्यांचे आहेत. ज्येष्ठ, वृध्द नागरिकांबरोबर सामान्य प्रवाशांचीही हे जिने चढताना दमछाक होते. प्रवाशांची गैरसोय विचारात घेऊन लवकर पादचारी जिन्याची उभारणी करावी म्हणून कल्याण कसारा रेल्वे प्रवासी संघटना, कल्याण कर्जत कसारा रेल्वे प्रवासी संघटनेचे पदाधिकारी प्रयत्नशील होते. आसनगाव रेल्वे स्थानकातून शहापूर तालुक्यातील सुमारे ५० हून अधिक खेड्यांमधून नागरिक नोकरी, व्यवसायानिमित्त सुमारे एक लाखाहून अधिक प्रवासी प्रवास करतात.

# ठाणे महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते मिलिंद पाटील शिंदे सेनेत



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासोबत आम्ही काम केलेली माणसे असून आम्हाला विकासाची सवय आहे. पण, मधल्या काळात सत्ता नसल्यामुळे कळव्याचा विकास रखडला आहे. पुढे सत्ता येणारच नाही, असे आमचे म्हणणे नाही. परंतु कळव्यापुढे आता वेळ नाही, अशी प्रतिक्रिया शिवसेना (शिंदे) पक्षात प्रवेश केल्यानंतर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे माजी नगरसेवक आणि ठाणे पालिकेचे विरोधी पक्ष नेते मिलींद पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे. तसेच जितेंद्र आव्हाड विकास पुरुष तर, एकनाथ शिंदे महाविकास पुरुष असा उल्लेखही त्यांनी यावेळी केला.

ठाणे महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते मिलिंद पाटील, माजी नगरसेविका मनाली पाटील, माजी नगरसेवक महेश साळवी, माजी नगरसेविका मनिषा साळवी, माजी नगरसेविका व ठाणे महिला राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्याध्यक्षा सुरेखा पाटील, माजी नगरसेवक सचिन म्हात्रे यांनी भगवा झेंडा हाती घेऊन शिवसेनेमध्ये प्रवेश केला. या प्रवेशानंतर मिलिंद पाटील यांनी पत्रकारांना संवाद साधत प्रतिक्रिया दिली. धक्कादेण्यापेक्षा एखादा माणूस समाजकारणात किंवा राजकारणात येतो, त्यावेळी त्याची अपेक्षा असते की, आपल्या प्रभागाचा विकास व्हावा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या विकासाबद्दल आम्ही काय बोलणार, त्यांनी केलेला विकास संपुर्ण महाराष्ट्राने पाहिला आहे. तो आम्हाला सांगायची गरज नाही. जितेंद्र आव्हाड यांच्यासोबत काम केलेली आम्ही माणसे आहोत.

त्यामुळे आम्हाला विकासाची सवय आहे. परंतु मधल्या काळात सत्ता नसल्यामुळे कळव्याचा विकास रखडला होता. सत्ता येणारच नाही असे आमचे म्हणणेच नाही. पण कळव्यापुढे आता वेळ नाही, असे पाटील म्हणाले. जुन्या इमारतींचा पुनर्विकास आणि नवीन विकास आराखड्यामुळे पुनर्विकास अशक्य होईल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ४० वर्षे जुन्या इमारती आहेत. पाच वर्षात नागरिकांना इमारती रिकाम्या कराव्या लागतील. काही लोक इमारतीची दुरुस्ती करत आहे. परंतु बांधकाम स्थिरता प्रमाणपत्र तीन वर्षापेक्षा जास्त मिळत नाही. त्यामुळे येणाऱ्या भविष्याचा आता विचार करणे गरजेचे होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली. त्यांनी आम्हाला या सर्वावर आश्वासन दिले, असेही पाटील म्हणाले.

आमदार जितेंद्र आव्हाड यांनी यापुर्वीच सांगितले होते की, कळव्यात विकासकामे झाली, त्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कधीच निधीची कमतरता पडू दिली नाही. त्यामुळे एका विकास पुरुषाकडून महाविकास पुरुषाकडे जातोय. या मागे आमचा उद्देश आहे की, प्रभागाचा विकास व्हावा. राजकारण हा लोककल्याणकारी राज्याकडे जाणारा मार्ग आहे आणि सत्ता हे त्याचे साधन आहे. ते साधन आम्हाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून मिळत असेल. तर, भावनेत अडकून निर्णय चुकीचे घेण्यापेक्षा आपण काहीतरी नवा निर्णय घेऊन लोकांचा विकास करण्यासाठी वेळ मिळेल. आम्हीही राजकारण किती वर्षे करणार पण, जेवढे करू तेवढ भरभरून देऊ, या अपेक्षेने हा पक्ष प्रवेश केला. वर्षभर चर्चा सुरू होती, असेही पाटील म्हणाले.

# नवी मुंबईतल्या कांदळवनातील अतिक्रमणे हटवा

## वनमंत्री गणेश नाईक यांचे पालिकेला आदेश



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** नवी मुंबई क्षेत्रातील कांदळवन भागात असलेली अतिक्रमणे तात्काळ हटवण्याचे आदेश वनमंत्री गणेश नाईक यांनी नवी मुंबई महापालिकेला दिले आहेत. बुधवारी मुंबई मंत्रालय येथे राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे तसेच पालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कांदळवन क्षेत्रात असलेल्या अतिक्रमण संदर्भात बैठकीत नाईक यांनी कांदळवन क्षेत्रातील अतिक्रमणे हटवण्याचे निर्देश नवी मुंबई महापालिका आयुक्तांना दिले असून अतिक्रमणाबाबत आढावा घेत कांदळवन भागात ज्या ज्या ठिकाणी अतिक्रमण झाल्याचे रेकॉर्डवर आले आहे ते हटविण्यासंदर्भात निर्देश दिले.

तसेच अतिक्रमण कारवाई केल्यानंतर नंतर पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण होऊ नये म्हणून प्रभावी उपाययोजना करा असे देखील महापालिका प्रशासनास बजावले आहे.

नवी मुंबई महापालिका महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी कांदळवन भागात असलेले अतिक्रमण हटविण्यासाठी कशा पद्धतीने कारवाई केली जात आहे आणि कसा तंत्रज्ञानाचा वापर करून कांदळवनाचे संरक्षण केले जात आहे याची सविस्तर माहिती दिली. पालिकेने कांदळवन क्षेत्रात असलेल्या जवळजवळ ७०० पेक्षा अधिक झोपड्या पालिकेने काढल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

नाईक यांच्या समवेत झालेल्या बैठकीला महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्यासह अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, नगररचना अधिकारी सोमनाथ केकाण, अतिक्रमण विभागाचे अधिकारी कैलाश गायकवाड तसेच वनविभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# पार्किंग समस्या सोडविण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज

## - नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलींद भारंबे




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** नवी मुंबई, पनवेल, उरण या पट्ट्यात उभे रहाणारे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रकल्प, झपाट्याने होत असलेले नागरीकरण आणि त्यामुळे वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता मुंबईसारख्या महानगरीला खेटून असलेल्या महामुंबईतही पायाभूत सुविधांच्या आघाडीवर अनेक आव्हाने उभी रहातील. या आव्हानांना तोंड देण्यासाठी सर्वच नियोजन प्राधिकरणांच्या एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता आहे, असे ठाम प्रतिपादन नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलींद भारंबे यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना केले. उपनगरांमधील अंतर्गत पार्किंगाचा प्रश्न आताच जटील बनू पहात आहे. या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी नियोजन प्राधिकरणांनी ठोस आणि भविष्यवेधी प्रकल्पांची आखणी करण्याची गरज असून शहरांच्या विकास आराखड्याचा सातत्याने फेर अभ्यास आणि आढावा घेण्याची आवश्यकताही भारंबे यांनी व्यक्त केली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, एज्यु सिटी, तिसरी मुंबई, लॉजिस्टीक पार्क, डेटा सेंटर्स असे भविष्यवेधी प्रकल्प नवी मुंबईत उभे रहाणार आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापारवृद्धीचे हे केंद्र ठरावे अशापद्धतीची आखणी केंद्र आणि राज्य सरकारकडून केली जात आहे. एकीकडे हे होत असताना शहरातील जवळपास प्रत्येक उपनगर पुर्नविकासाच्या प्रक्रियेतून जात आहे. शहराची आभाळरेषाच यामुळे बदलणार आहे. यामुळे शहरात नियोजनाची अनेक आव्हान येत्या काळात उभी रहातील. यापैकी सर्वाच मोठे आव्हान हे पार्किंगचे असेल, असे भारंबे यांनी सांगितले. यापूर्वी ज्या घरात एक वाहन नव्हते त्या कुटुंबात आता तीन-तीन वाहने आली आहेत. ही वाहने उभी करायची कुठे, कशी हा प्रश्न आवासून उभा राहिला आहे. शहर पुनर्विकासाच्या प्रक्रियेतून जात असताना याविषयी गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे, असे त्यांनी सांगितले. अन्यथा रस्त्याच्या कडेला उभी रहाणारी वाहने आणि पोलिसांकडून केल्या जाणाऱ्या कारवाया हे चित्र आपल्याला नित्याचे पहायला मिळेल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

भविष्यातील वाढत्या वाहनांची संख्या ध्यानात घेऊन शहरातील इमारतींसोबत बाजारालगत वाहनतळांचे नियोजन प्राधिकरणाने विकास आराखड्यात करणे गरजेचे आहे, असे भारंबे यांनी स्पष्ट केले. मुंबई, नवी मुंबई आणि पनवेल ते अलिबाग या पट्ट्यात उभारले जाणारे उड्डाणपुल, विविध कॉरीडॉर यामुळे भविष्यात सर्वसामान्यांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्था जवळची वाटू शकेल, असा दावाही त्यांनी केले. मेट्रो, विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका, दिल्ली मुंबई कॉरीडॉर, दिल्ली जेएनपीटी फ्रेट कॉरिडॉर यामुळे दळणवळणाची नवी दिशा या परिसराला मिळेल, असेही ते म्हणाले.

# वसई विरार मनपाच्या ई बसला नागरिकांची पसंती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई:** वसई विरार शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी पालिकेच्या परिवहन विभागाकडून ई बस सेवेत उतरविण्यास सुरुवात केली आहे. सोमवारी पालिकेने वसई, भुईगाव व किल्लाबंदर या मार्गावर ११ ई बस सुरू केल्या आहेत. वसई विरार शहरात पालिकेच्या परिवहन विभागाकडून बस सेवा दिली जाते. शहराच्या वाढत्या नागरीकरणाच्या तुलनेने या बसेस सुद्धा अपुऱ्या पडत आहे. तर काही ठिकाणच्या मार्गावर ही बसेस कमी फेऱ्या असल्याने प्रवाशांची फारच गैरसोय होत असते. प्रवाशांना चांगली सुविधा उपलब्ध व्हावी व शहरातील प्रदूषण कमी व्हावे व पर्यावरण संतुलन राखले जावे यासाठी पालिकेने विद्युत बस खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत या ई बस खरेदी केल्या आहेत. सद्यस्थितीत पालिकेच्या परिवहन विभागात ४० ई बस दाखल झाल्या आहेत.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी (दळखण)
ता. शहापूर, जि. ठाणे ४२१ ६०१ (मुंबई विद्यापीठाशी संलग्न) ISO 9001 : 2005
विद्यार्थ्यांची स्वप्न अनेक पण स्वप्नपूर्तीचं केंद्र एक...
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT)
UNDER GRADUATION: B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com, M.A. मराठी, M.A. अर्थशास्त्र, M.A. समाजशास्त्र, M.A. भूगोल
ADMISSION OPEN
For More Details Email - jeevandeepkhardi@gmail.com
Website- www.jsspcollegekhardi.in
8669244522, 9167043099
9923992390, 9619188558

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

## ठाणे येथील सैनिकी मुलांसाठी कर्मचारी भरती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, ठाणे यांच्या आधिपत्याखालील धर्मवीरनगर, नौपाडा, ठाणे (पश्चिम) येथील सैनिकी मुलांचे वसतिगृह, ठाणे आणि माजी सैनिक विश्रामगृह, ठाणे या दोन आस्थापनांवर शैक्षणिक वर्ष 2025-26 साठी माजी सैनिक आणि नागरी प्रवर्गातून कर्मचारी भरती करण्यात येणार आहे.

वसतिगृहासाठी भरण्यात येणारी पदे :- A) सहाय्यक वसतिगृह अधीक्षक - 01(फक्त माजी सैनिक प्रवर्गातून), B) पहारेकरी (निवासी) - 01, C) स्वयंपाकी - 03, D) सफाई कर्मचारी - 01. विश्रामगृहासाठी भरण्यात येणारी पदे :- A) स्वागत कक्ष सहायक - 01 (फक्त माजी सैनिक प्रवर्गातून), B) पहारेकरी (निवासी) - 01, C) सफाई कर्मचारी - 01, D) माळी – 01.

ह्या नियुक्ती कंत्राटी पद्धतीने अशासकीय संवर्गातून महाराष्ट्र शासन यांचे सैनिक कल्याण विभाग, पुणे द्वारे वेळोवेळी निर्धारीत एकत्रीत मानधनावर असतील. नागरी उमेदवारांनी अर्जासोबत शैक्षणिक प्रमाणपत्र, आधार कार्ड, पॅनकार्ड असल्यास अनुभवाचा दाखला तसेच रहिवाशी पुरावा जोडणे बंधनकारक राहील. माजी सैनिक प्रवर्गातील उमेदवारांना उल्लेखीत कागदपत्रांसह त्यांचे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाद्वारे देण्यात आलेले ओळखपत्र, डिस्चार्ज बुक/सर्व्हिस पर्टीक्युलेर यांची प्रत जोडणे अनिवार्य आहे. अर्ज मिळणे आणि जमा करण्याचा पत्ता -

1) सैनिकी मुलांचे वसतिगृह ठाणे, धर्मवीरनगर, नौपाडा, ठाणे (प) - 400604 तसेच 2) जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, ठाणे, रु.नं. ४०२, कलेक्टर ऑफिस, कोर्ट नाका, ठाणे (प)-४००६०१ (सोमवार ते शुक्रवार फक्त). सेवा नियम, मानधन इत्यादी अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक मो. ९७६९६६४८३० (वसतिगृह), 9246624105(अधीक्षक). अर्ज जमा करण्याची शेवटची तारीख 08 जून 2025 असून निवड प्रक्रिया मुलाखती दि. 10 आणि 11 जून 2025 (मंगळवार आणि बुधवार) रोजी सकाळी 11.00 वाजता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, ठाणे येथे घेण्यात येतील. उमेदवारांना त्यांच्या मुलाखतीचा दिवस भ्रमणध्वनी द्वारे कळविण्यात येईल, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ठाणे/पालघर मे. प्रांजळ जाधव (नि.) यांनी कळविले आहे.

# पुणधे – आटगांव हद्दीवर असलेली पुरातन वास्तु भग्नावस्थेत

## सुशोभीकरण करून पर्यटन स्थळ घोषित करा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



शहापुर : रचनात्मक व अप्रतिम वास्तुशिल्प हे आपल्या भारतीय संस्कृतीतील अनमोल असा ठेवा आहे. वास्तु शिल्पांवरील कोरीव कामांवरुन व बोध चिन्हांवरून आपल्याला समकालीन संस्कृतीचे दर्शन घडत असते. ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील मुंबई-नासिक महामार्गालगत असणाऱ्या" पुणधे - आटगांव " या दोन गावांच्या सीमेवर असलेली " पांडव लेणी " ही एक अशाच पुरातन वास्तुशिल्प कलेचे दर्शन देणारी अलौकीक लेणी आहे. मात्र पुरातत्व खात्याचे या अमूल्य अशा वास्तुकडे दुर्लक्ष असणे ही खेदाची बाब आहे. त्यामुळेच आज रोजी ही पुरातन वास्तु भग्नावस्थेत असल्याचे चित्र दिसत आहे.

आटगांव (म.रे.) स्टेशनपासून अवघ्या दिड किलोमीटर अंतरावरील एका टेकडीवर असलेली ही पांडव लेणी नयनरम्य अशा हिरव्यागर्द वनराई मध्ये वर्षानुवर्षापासून आपले अस्तित्व टिकवून आहे. या लेणी विषयी अनेक दंतकथा स्थानिकांकडून सांगितल्या जातात. एक कथा अशीही सांगितली जाते की, महाभारतातील पाच पांडवांनी एका रात्रीत ही लेणी पूर्ण करण्याचा "पण" केला होता. मात्र एका रात्रीमध्ये ही लेणी पूर्ण न झाल्याने अर्धपूर्ण स्थितीतच ही लेणी राहिली. पांडवांनी ही लेणी बांधली म्हणूनच हिला " पांडव लेणी " असे म्हणतात. मात्र या ठिकाणचे कोरीव काम - कलाकुसर पाहिली असता हे पांडव लेणी मंदिर ईसवी सन ८ व्या शतकापासून ते १३ व्या शतका दरम्यानचे असावे, असे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे. असे हे पुरातन कालीन पांडव लेणी मंदिर शासनाच्या दुर्लक्षामुळे व स्थानिकांच्या उदासिनतेमुळे भग्नावस्थेत आहे.

आटगांव एमआयडीसीतील कंपनीच्या सौजन्याने दरवर्षी येथे " घटस्थापन ते दसरा " व " गुढीपाडवा ते श्रीराम नवमी " अशा दोन वेळेस आश्विन व चैत्र नवरात्रौत्सव साजरा केला जातो. या निमित्ताने पुणधे - आटगांव येथील ग्रामस्थांच्या सहकार्याने हा नवरात्रौत्सव होम हवन व देवीचा भंडारा मोठ्या आनंदाने साजरा केला जातो. पुरातत्व खात्याने दखल घेतली व शासनाने जर या "पांडव लेणी" मंदिराकडे लक्ष घातले तर या लेणीचा जिर्णोध्दार होऊ शकतो.येथे शासनाने येथे पांडव कालीन इतिहास जपण्यासाठी येथे पर्यटन स्थळ घोषित करून येथील परिसराचे सुशोभीकरण केल्यास स्थानिक बेरोजगाराना रोजगार उपलब्ध होईल.

> शालेय महाविद्यालयीन विद्यार्थी व शासनाने या पांडव लेणी परिसरात अभ्यास दौरे केले किंवा समाजसेवा उपक्रमातून या पांडव लेणीची डागडुजी केली तर खऱ्या अर्थाने संस्कृतीच्या एका अमूल्य प्रतिकाची जोपासना केल्यासारखे होईल. अशा प्रकारे या पांडव लेणी मंदिराची शासनाने दखल घेऊन या लेणीचे सुशोभिकरण करावे" : संतोष घोडविंदे,सामाजिक कार्यकर्ते.

> पुंधे येथील पांडवकालीन लेणींचा अभ्यास करून ते जतन करण्यासाठी येथे सुशोभीकरण करून पर्यटन स्थळ घोषित करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.- पांडुरंग बरोरा,माजी आमदार.




# पाईपलाईनसाठी खोदलेल्या रस्त्यामुळे नागरिकांची होतेय गैरसोय

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : केडीएमसी क्षेत्रातील अटाळी, पंपहाऊसकडे जाणारा मुख्य रस्ता, वडवली मुख्य रस्ता व आंबिवली रेल्वे स्टेशन बाजारपेठ रस्त्यावर पाणी पुरवठा विभागाने पाईपलाईन टाकण्यासाठी खोदकाम केले होते. त्यावर खडीकरण व डांबरीकरण न केल्यामुळे सर्व पादचारी व वाहन चालक यांची गैरसोय होत आहे. दुचाकी गाड्यावरून लोक पडत आहेत, याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून पावसाळयात अवस्था गंभीर होऊ शकते म्हणून याबाबत आरपीआयचे भिवंडी लोकसभा सोशल मीडिया आय टी सेल प्रमुख दीपक संकपाळ यांनी लक्ष वेधले असून याबाबत केडीएमसी आयुक्तांची भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विशेष म्हणजे, वडवली उड्डाण पूल ते अटाळी रेल्वे गेट क्र. ४८ दरम्यानचा रस्ता काही महिन्यांपूर्वी नगरसेवक दुर्योधन पाटील व हर्षाली थविल यांच्या पाठपुराव्याने नव्याने बनवण्यात आला होता. या रस्त्याची गुणवत्ता उत्तम असून वर्षानुवर्षे दुर्लक्षित असलेला रस्ता पहिल्यांदाच चांगल्या प्रकारे तयार झाला होता. मात्र, पाणी पुरवठा विभागाच्या बेजबाबदार कामामुळे तो पुन्हा उद्ध्वस्त झाला आहे.



या खोदकामादरम्यान वडवली-अटाळी-आंबिवली भागाला वीज पुरवठा करणारी केबल दोन वेळा खराब झाली. एकदा रात्री संपूर्ण परिसर अंधारात गेला आणि दुसऱ्या वेळी दहा तास दिवसा वीज बंद राहिली. यामुळे व्यापारी, दुकानदार व नागरिकांचे आर्थिक नुकसान झाले. महावितरणच्या केबलचे स्थानिक नकाशे घेऊन काम न केल्याने ही परिस्थिती उद्भवली. याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चितच टाकता येईल. तसेच, वार्ड ऑफिसजवळील अपूर्ण खोदकामामुळे काही दिवसांपूर्वी एका महिलेला अपघात झाला. सुदैवाने गंभीर दुखापत टळली. मात्र, या परिसरात अजूनही खोदलेले रस्ते तसेच खुले खड्डे असल्याने दररोज अपघात घडत आहेत.

या संपूर्ण परिस्थितीमुळे नागरिक त्रस्त झाले असून, परिसरात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. व्यापारी व रहिवाश्यांना आरोग्याच्या तक्रारींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर आरपीआय सोशल मीडिया आय टी सेलचे भिवंडी लोकसभा प्रमुख दीपक सकपाळ यांनी सांगितले की, "आम्ही लवकरच नवनियुक्त आयुक्त अभिनव गोयल यांची भेट घेऊन पाणी पुरवठा विभागाच्या जलवहिन्या टाकण्याच्या कामामुळे दुरावस्था झालेल्या रस्त्याचे काम मार्गी लावणार या बाबत निवेदन देणार आहोत. संबंधित ठेकेदार आणि पालिकेतील दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी यावेळी केली जाईल."

# कृषी विभागाने शेतकऱ्यांना खते व बियाणांचा पुरवठा सुरळीत करावा - जिल्हाधिकारी किशन जावळे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : आगामी खरीप हंगाम लक्षात घेता बियाणे, खते, कीटकनाशके आदी निविष्ठा सर्वत्र उपलब्ध असण्याच्या दृष्टीने परिपूर्ण नियोजन करा तसेच कोणत्याही परिस्थितीत खते, बियाणे यांची टंचाई भासणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित खरीप हंगाम आढावा बैठकीत जिल्हाधिकारी श्री.जावळे बोलत होते. बैठकीला खा.धैर्यशील पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी जिल्हा सत्यजित बढे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे आदी उपस्थित होते.

खरीप हंगामामध्ये बियाणे आणि खतांचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर जाणवतो. त्यामुळे या दोन्हीचे नियोजन आवश्यक आहे. पिक पेरणी क्षेत्राला आवश्यक असणाऱ्या बियाण्यांची उपलब्धता होण्यासाठी कृषी विभागाचे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे. गुणनियंत्रण विभागाने दक्ष राहून बोगस बियाणे, खतांची विक्री होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी अशा सूचना जिल्हाधिकारी श्री. जावळे त्यांनी दिल्या. खरीप पीक हंगामासाठी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा सुरळीत झाला पाहिजे. एकही शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. पीक कर्जाचे देण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण करा तसेच शेतीपंपासाठी आवश्यक त्या प्रमाणात वीजपुरवठा होईल यादृष्टीने विद्युत विभागाने नियोजन करावे. शेतकऱ्यांना पिक विम्याची समस्या जाणवते. पिक विमा योजनेचा शेतकऱ्यांना फायदा होण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेने लक्ष देण्याची गरज आहे. यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी श्री.जावळे यांनी जिल्ह्यातील सर्व तालुका कृषी अधिकारी यांनी जिल्ह्यातील फार्म हाऊस धारकांना किमान एक पीक लागवड करण्याचे आवाहन करावे व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी असे सांगितले. तसेच प्रत्येक कृषी सेवकाला गाव निवडून तेथील पीक क्षेत्र दुप्पट करण्याचे उद्दिष्ट देण्यात यावे असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. शेतकऱ्यांना नवीन नवीन पिके घेण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे. हळदी व आले पीक प्रात्यक्षिक घेण्यात यावे तसेच पेण मध्ये प्रायोगिक तत्वावर आले पीक घेण्यात यावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. हळदीचे क्षेत्र वाढविण्यासाठी सामूहिक प्रयत्न करावेत अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्री.जावळे यांनी दिल्या.

खा.धैर्यशील पाटील यांनी कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सर्व सेवा, सवलती त्यांच्या पर्यंत वेळेत पोहोचव्यात. निकृष्ट दर्जाचे खत पुरवठा करणाऱ्या कंपनीवर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश खा. पाटील यांनी यावेळी दिले.

बैठकीच्या सुरूवातीला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी खरीप हंगामपूर्व तयारी व नियोजनाचा आढावा सादर केला. यावेळी जिल्ह्यातील नाविन्यपूर्ण उपक्रम राबविलेल्या शेतकऱ्यांचा मान्यवरांचा हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या विविध माहितीपुस्तिकांचे मान्यवरांच्या हस्ते विमोचनही करण्यात आले. बैठकीस सर्व संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. असे आहे खरीप हंगाम 2025 चे

**नियोजन :-**
खरीप हंगामातील भातपिकासाठी 81 हजार 335 हेक्टर क्षेत्रावर नियोजन
भात पिकासाठी 2 हजार 995 किलोग्रॅम/हेक्टर उत्पादनाचे लक्ष
खरीप हंगामातील नाचणी पिकासाठी 2 हजार 550 हेक्टर क्षेत्रावर नियोजन
नाचणी पिकासाठी 1 हजार 260 किलोग्रॅम/हेक्टर उत्पादनाचे लक्ष,

# पाकिस्तानचे समर्थन करणाऱ्या युवकावर गुन्हा दाखल



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : काश्मीर पहलगाम अतिरेकी हल्ल्याचे प्रत्युत्तर भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिलेला असतानाच, भिवंडी शहरातील एका युवकाने आपल्या मोबाईलच्या ईस्टग्राम स्टोरी वर पाकिस्तानचे समर्थन केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली असुन त्या विरोधात गंभीर दखल घेत देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे अशी माहिती भिवंडी शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कृष्णदेव खराडे यांनी दिली आहे.

अफसर अली अजगर अली शेख (वय १८, रा.घुंगटनगर) असे अटक आरोपीचे नाव आहे.

बुधवारी भारतीय सैन्याने पाकिस्तानी अतिरेक्यांवर कारवाई केली.त्याचे संपूर्ण देशवासीयां कडून स्वागत करीत बदला घेतल्या बद्दल आनंदोत्सव साजरा केला जात असताना भिवंडी शहरातील रा.घुंगटनगर याने आपल्या मोबाईल वर इंस्टाग्राम स्टेटस वर "चाहें जो हो जाये सपोर्ट तो बस पाकिस्तान को करेंगे" असा देशविरोधी संदेश ठेवला होता.ही बाब राष्ट्रप्रेमी नागरिकांना समजताच त्यांनी भिवंडी शहर पोलिस ठाण्यात धाव घेत देशद्रोही व्यक्तीविरोधात कारवाई करण्याची मागणी केली. पोलिसांनी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेत तातडीने आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली. पोलिस हवलदार शैलेश भोसले यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी आरोपी युवकास रात्री उशिरा ताब्यात घेतले.त्या विरोधात भा.न्या. सं.कलम १५२ प्रमाणे देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून अटक केली आहे अशी माहिती कृष्णदेव खराडे यांनी शेवटी दिली.

# २१ वर्षीय तरुणीवर अमानुष अत्याचार

## मैत्रिणींनी फसवून नशेच्या इंजेक्शनद्वारे बेशुद्ध ठेवत सात जणांकडून सामूहिक बलात्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : कल्याण ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका २१ वर्षीय तरुणीवर तब्बल १० दिवस नशेच्या इंजेक्शनद्वारे बेशुद्ध ठेवून सात जणांकडून सामूहिक बलात्कार झाल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. या प्रकारात तरुणीच्या ओळखीच्या दोन महिला आणि पाच पुरुषांचा सहभाग असून टिटवाळा पोलिस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. १९ मार्च रोजी रात्री घरगुती वादानंतर संबंधित तरुणी आपली मैत्रिण जिनत हिच्या बनेली येथील घरी गेली. त्यावेळी जिनतच्या घरी तिची दुसरी मैत्रीण शबनमसुद्धा उपस्थित होती. त्याठिकाणी पिडीत महिला ही काही दिवस राहिली. यानंतर २५ मार्च रोजी सकाळी संबंधित तरुणीने घरी जायचे आहे असे सांगितल्यावर जिनत आणि शबनमने तिला "आपण तुला गाडीने घरी सोडतो" असे सांगितले. त्यांनी फोन करून गुड्डु या इसमाला बोलावले आणि गुड्डु काळया रंगाच्या चारचाकी गाडीने जिनत, शबनम, गुलफामसह आले.

पिडीत तरुणी गाडीत बसली असता तिला घरी नेण्याऐवजी आंबिवलीतील एनआरसी कॉलनीजवळील एका चाळीत घेऊन गेले. तिथे 'चाळीतील रूम बघू आणि मग घरी जाऊ' असे सांगून तिला खोलीत नेण्यात आले. त्या खोलीत शबनमने पिडीत तरुणीच्या मानेला नशेचे इंजेक्शन दिले. त्यानंतर ती बेशुद्ध झाली आणि जेव्हा शुद्धीवर आली तेव्हा ती रामबाग, कल्याण येथील लियाकत नामक इसमाच्या रेस्ट रूममध्ये होती. ती पूर्णतः नग्न अवस्थेत होती ज्यावरून तिच्यावर अत्याचार झाल्याचे तीला जाणवल्याचे तिने आपल्या तक्रारीत म्हटले आहे. पुढील चार दिवस ती अर्धशुद्ध अवस्थेत होती, तिला सातत्याने नशेचे इंजेक्शन दिले जात होते. दरम्यान जिनत, शबनम, गुड्डु, गुलफाम, लियाकत आणि एक अनोळखी इसम वेळोवेळी तिच्यावर शारीरिक अत्याचार करत होते. तिला बिअर पाजून, बळजबरी करून, संमतीशिवाय लैंगिक संबंध ठेवले गेले. या अत्याचारात लियाकतच्या रेस्ट रूमचा अनेक वेळा वापर करण्यात आला. त्या ठिकाणी नेऊन वारंवार तिला नशा देऊन तिच्यावर बलात्कार करण्यात आला. तसेच गुड्डु या इसमाने अली ईराणी याला फोन करून "जर तू काही सांगितले तर तुला आणि तुझ्या घरच्यांना जिवंत ठेवणार नाही" अशी धमकी दिली. त्याच दडपणाखाली पीडित तरुणीने सुरुवातीस आपल्या दादीविरोधात खोटी तक्रार सुद्धा दाखल केली.

पुढे दि. ३ मे रोजी रात्री १२ वाजता शुद्ध आल्यावर तिने स्वतःला एका कुलूपबंद खोलीत बंद केलेले पाहिले. जोरजोराने रडल्यावर बाहेरून जात असलेल्या एका इसमाने कुलूप फोडून तिला बाहेर काढले व घरी सोडले. या अमानुष घटनेत आरोपी म्हणून जिनत, शबनम, गुड्डु, गुलफाम, लियाकत, अली ईराणी आणि एक अनोळखी इसम यांच्यावर गंभीर स्वरूपाचे आरोप करण्यात आले आहेत. टिटवाळा पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## मुरबाड नगरपंचायत हद्दीतील पथदिवे दुरुस्ती होणार कधी ?



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड नगरपंचायत हद्दीतील पथदिवे (स्ट्रीट लाईट) गेले अनेक महिने बंद आहेत. यासंदर्भात जागरूक नागरिकांनी मुरबाड नगरपंचायतच्या निदर्शनास आणून देखील नगरपंचायत प्रशासन दुर्लक्ष करत आहे. उंच खांबावरील पथ दिवे दुरुस्तीसाठी वाहन नसल्याची कारणे नागरिकांना मिळत होती. यासाठी स्थानिक आमदार किसन कथोरे यांच्या सहकार्याने मागिल पंधरा दिवसांपूर्वी ओझेन हायड्रोलिक विद्युत वाहन खरेदी करून त्याचे लोकार्पण देखील त्यांच्या हस्ते करण्यात आले होते. वाहनाची व्यवस्था झाली असताना सुद्धा मुरबाड नगरपंचायत याबाबतीत उदासिन असल्याचे दिसत असल्याने शहरातील स्थानिक नागरिक मात्र नाराज असल्याचे चित्र दिसत आहे. दरम्यान यासंदर्भात या विभागाच्या प्रमुख वैशाली देशमुख मॅडम यांच्याशी संपर्क साधला असता रोड लाईट दुरूस्ती साठी लागणारे साहित्य उपलब्ध नव्हते त्याची मागणी केलेली आहे ते आल्यावर तात्काळ रोडलाईट दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.

# सेवासदन शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्र संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : शनिवार दिनांक ३ मे २०२५ रोजी उल्हासनगर येथील सेवासदन शिक्षणशास्त्र महाविद्यालय (स्वायत्त) आणि "अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष" (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा सदन शिक्षण महाविद्यालय उल्हासनगर येथे सेवासदन ट्रस्टचे अध्यक्ष आणि विश्वस्त मा.श्री. संजय डबराई, आणि सेवासदन ट्रस्टचे सचिव मा.श्री. कमलेश तलरेजा यांच्या प्रेरणेने "कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित शिक्षण...संधी आणि आव्हाने" या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र (हायब्रिड मोड) आयोजित करण्यात आले होते. चर्चासत्राच्या सुरुवातीला विद्येची देवता माता सरस्वतीच्या प्रतिमेचे मान्यवरांनी पूजन केले तर सेवासदनच्या विद्यार्थ्यांनी सुमधुर आवाजात सरस्वतीवंदना व विद्यापीठ गीत सादर केले.



यावेळी प्रभारी प्राचार्या डॉ. रेणुका शेवकानी यांनी प्रमुख मान्यवरांचे स्वागत करून त्यांचा परिचय करून दिला. तर प्रमुख अतिथी आणि उद्घाटक तन्मय बलवा (संचालक शैक्षणिक, न्यूटन स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी, सोनीपत) यांनी चर्चासत्राचे उद्घाटन केले.याप्रसंगी डॉ. अविनाश डांगवानी (सहयोगी प्राध्यापक, व्हीईएस पॉलिटेक्निक, चेंबूर, मुंबई) यांनी उत्तम प्रकारे चर्चासत्राचे बीजभाषण केले. प्रथम व द्वितीय सत्रात अनेक संशोधन अभ्यासक यांनी आपले रिसर्च पेपर प्रेझेंटेशन केले. संबंधित रिसर्च पेपरच्या अनुषंगाने डॉ. काला, (प्राचार्य, आरकेटी कॉलेज) आणि डॉ. गुलाब चंद गुप्ता, (प्राचार्य, SSCOA) यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच सन्माननीय अतिथीं प्रा.देवेंद्रजी कोडवानी (उच्च शिक्षण अकादमीचे वरिष्ठ फेलो, कुलगुरूंचे प्रतिनिधी, आंतरराष्ट्रीय आणि पदव्युत्तर कार्यक्रम, द ओपन युनिव्हर्सिटी, यूके) यांनी आदर्श रिसर्च पेपर प्रेझेंटेशनसाठी अत्यंत सुंदर भाषण केले. तर शेवटच्या सत्रात डॉ. पांडुरंग व्ही. बरकाले (सल्लागार, उच्च शिक्षण राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा), महाराष्ट्र शासन, मुंबई) यांनी आणि डॉ अरुल पी. (ग्रंथपाल, सेवा सदन शिक्षणशास्त्र महाविद्यालय) यांनी उत्तम मार्गदर्शन केले.महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.रेणूका शेवकानी, प्राध्यापक डॉ.संजय निंबाळकर, सहयोगी प्राध्यापिका डॉ.हिना वाधवानी, डॉ.संध्या महाजन डॉ. राजकुमारी पंजाबी, डॉ. भक्ती जयसिंघानी, डॉ.रुक्मिणी जामदार, डॉ.मेरी वर्गीस, डॉ.राजश्री जोशी, डॉ.शीतल शिरोळ, डॉ.स्नेहा सामंत आदी मान्यवर आणि प्रा.सुनील म्हसकर प्रा. सुनील निंबियार, प्रा.सचिन पाटील, प्रा.अर्चना भालेवार असे अनेक संशोधन अभ्यासक उपस्थित होते. या चर्चासत्राच्या प्रसंगी देशभरातून विविध विद्यापीठ व शैक्षणिक व सामाजिक संस्थांमधून आलेल्या प्राध्यापक व संशोधन अभ्यासक तसेच मुख्य विषयाशी संबंधित अनेक नाविन्यपूर्ण विषयांवरील संशोधन प्रबंध व शोध निबंध सादर केले. संशोधन अभ्यासक प्रा.सुनील निंबियार आणि प्रा.सुनील म्हसकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.रेणूका शेवकानी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक यांच्या अथक परिश्रमाने तसेच बी.एड. व डी.एड. विद्यार्थ्यांच्या मदतीने सदर चर्चासत्र यशस्वीपणे पार पडले. डॉ.रुक्मिणी जामदार यांनी चर्चासत्राचे अहवाल वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व निवेदन डॉ.रुक्मिणी जामदार व डॉ.राजकुमारी पंजाबी यांनी केले. या चर्चासत्रासाठी एल. सी. पोतदार, राहुल तपासे, अगस्ती चौधरी यांनी तांत्रिकदृष्ट्या सहकार्य केले.

राष्ट्रीय गीताने सदर आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप करण्यात आला.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024